# फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनची EID-Feast2020 ला पाठिंबा देण्यासाठी शेफ विकास यांना साथ

कोविड-१९ च्या महासंकटामे जगभरात मोठ्या प्रमाणावर परिणाम केला आहे. या पार्श्वभूमीवर लोकांचा उत्साह वाढवणे आणि या संकटकाळात त्यांना मदत करण्यासाठी इंडस्ट्रीज फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशन या त्यांच्या सीएसआर भागीदाराने शेफ विकास खन्ना आणि पश्चिमच्या कोलंबियासच्या साथीने एडफीस्ट२०२० या उपक्रमाला पाठिंबा दिला आहे.

या उपक्रमातून ५००० कुटुंबांना फळे आणि भाज्या पुरवण्यात आल्या आणि रमजान साजरी करण्यासाठी २,००,००० लोकांना अन्न पुरवण्यात आले. पवित्र हाजी अली दर्ग्याचे आशीर्वाद घेऊन या उपक्रमाची सुरुवात झाली आणि त्यानंतर योग्य सोशल डिस्टंसिंगचे नियम पाळत हे अन्न मुंबईत (मोहम्मद अली रोड, भायखळा आणि माहीम दर्गा) वाटण्यात आले.

मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया म्हणाले, या संकटामे जगभरातील लोकांचे नुकसान केले आहे आणि समाजातील वंचित गट तर यामुळे फारच अडचणीत सापडला आहे. एक जबाबदार नागरिक म्हणून त्यांना आशेचा किरण देत त्यांचे आयुष्य प्रकाशमान करण्याचा हा आमचा एक मार्ग आहे. या अडचणीच्या काळातही आपण एकत्र आहोत, हे यातून आम्ही सांगू इच्छितो.

फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष प्रकाश छाब्रिया म्हणाले, या संकटकाळात माझ्या देशातील लोकांची सेवा करण्यातून मला प्रचंड समाधान लाभले आहे. आम्ही स्थलांतरीत, झोपडपट्टीत राहणारे, रोजंदारी कामगार यांना अन्न, किराणा, पाणी, गरम जेवणाची पाकिटे, मास्क आणि इतर आवश्यक वस्तू पुरवून मदत करत आहोत. आमच्या सीएसआर फाउंडेशनमध्ये मदतीची दारे कधीही बंद होणार नाहीत.

यासंदर्भात शेफ विकास खन्ना म्हणाले, या संकटकाळात एक समाज म्हणून आपण एकत्र यायला हवे आणि माणसांचे हित बघायला हवे. एडफीस्ट२०२० च्या माध्यमातून अनेकांना या सणाचा आनंद देण्यासाठी आमची साथ दिल्याबद्दल मी मुकुल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे आभार मानतो.

मुकुल माधव फाउंडेशनतर्फे गरजूंना कोरडे धान्य, फळे आणि भाज्याही पुरवल्या जातात.